जा.क्र.कोजिप/साप्रवि/कावि-०१/ दु-लाभ /२०१९
सामान्य प्रशासन विभाग, जि.प. कोल्हापूर,
दिनांक- ०४/०९/२०१९

**वाचले-**

१. सा. प्र. विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दिनांक ८ जून, १९९५
२. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.१ एप्रिल, २०१०
३. वित्त विभाग शा. शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३दि.२३ डिसें २०१५
४. सा.प्र.वि.शा.नि.क्रमांक:एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२ तारीख १२/०९/२०१६
५. सा.प्र.वि.शा.नि.क्रमांक:एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२ तारीख १५ डिसेंबर २०१७
६. वित्त विभागाकडील परिपत्रक क्र.वेपुर-२०१९ प्रक्र-८, सेवा-९ दि. २० फेब्रुवारी २०१९
७. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वेतन २००९/प्र.क्र.२३/सेवा-३, दि.१ मार्च २०१९.
८. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्र.३/सेवा-३, दि.२ मार्च २०१९.
९. ग्राम विकास विभागाकडील शा. नि. क्र.डीएसआर-२०१९ प्रक्र-१६ आस्था-५ दि. ६ मार्च २०१९
१०. वित्त विभागाकडील परिपत्रक क्र.वेपुर-२०१९ प्रक्र-१५, सेवा-९ दि. १४ मे २०१९
११. पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/०९/२०१९ चे इतिवृत्तानुसार मंजूर टिपणी.

## आदेश

संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयानुसार गट क व ड (वर्ग ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेने आलेली कुंठीतता घालविणेसाठी दिनांक ०१.१०.१९९४ पासून कालबध्द पदोन्नती योजना आणि संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयाने सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणेत आली. आता संदर्भ क्र.८ चे शासन निर्णयाने, सातव्या वेतन आयोगांतर्गत ३ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आलेली आहे.

पहिल्या २ योजनांद्वारा दिलेला पहिला व दुसरा लाभ, या योजनेसाठी पहिला व दुसरा लाभ समजण्यात आलेले आहेत. हवालदार पद हे परिचर पदांच्या एकाच पदोन्नती साखळीतील पद असल्याने खालील परिचर कर्मचा-यांना हवालदार पदाची कार्यात्मक पदोन्नती दिलेली आहे. सदर लाभ पहिला लाभ समजून सदर लाभाच्या पहिल्या लाभा पासून १० वर्ष अखंड सेवा पूर्ण केलेली आहे.

त्यानुसार । **७ व्या वेतन आयोगाच्या तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना (दुसरा लाभ)** अंतर्गत हवालदार पदा नंतर एकाकी पदाची त्यांच्या नांवासमोर नमूद केलेल्या रकाना क्र. ७ वेतन मॅक्ट्रीक्स प्रमाणे रकाना क्र. ६ मधील दिनांकापासून या आदेशान्वये मंजूर करणेत येत आहे.

| अ. क्र | परिचर कर्मचाऱ्याचे पूर्ण नांव | कार्यालयाचे नांव | परिचर पदावरील हजर तारीख | हवालदार पदावरील हजर तारीख | सुधारित नियमाप्रमाणे दुसरा लाभ देय दिनांक | ७ व्या वेतन आयोगा नुसार मंजूर वेतन मॅक्ट्रीक्स |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.घाणे दत्तू किसान | प्रा.आ.केंद्र भादवण ता. आजरा | ०३/०३/२००४ | २९/१२/०००७ | २९/१२/२०१७ | S४/१७१००-५४००० |
| २ | श्रीम. गांगुर्डे सावित्रीबाई दादा | प्रा.आ.केंद्र भुये ता. करवीर | ३१/०१/२००३ | २९/१२/२००७ | २९/१२/२०१७ | S४/१७१००-५४००० |

१. सदर लाभाची वेतननिश्चिती करण्याआधी, लाभापूर्वीच्या वेतनावरील ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती करावी. (लाभाचा दिनांक ०१.०१.२०१६ असला तरी) त्यानंतरच संदर्भ क्र. ३ ते १० ने प्राप्त सूचनांप्रमाणे सुधारित संरचनेत लाभाच्या वेतनस्तरातील वेतननिश्चिती करावी.
२. या आधी मंजूर लाभाचे वेळी जरी विकल्प दिला असला, तरी सुधारित आदेशानंतरही पुन्हा विकल्प देण्याची मुभा राहील. असा विकल्प आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्यात घ्यावा.

३. या योजनेखाली लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष त्या पदाची पदोन्नती नाकारल्यास वा पदोन्नतीस अपात्र ठरल्यास, दिलेले लाभ काढून घेण्यात यावेत (परंतु आधीची वसुली करण्यात येऊ नये) आणि त्यांची वेतननिश्चिती वेतन नियम १९८२ नियम १२ अनुसार, त्यांनी लाभ घेतलेच नव्हते असे समजून करावी.

४. वरील कर्मचा-यांची अखंड सेवा असल्याची खात्री कार्यालय प्रमुखांनी करावयाची आहे.

५. वरील कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकी वरील कालावधीत असाधारण रजा करणेत आली असल्यास अथवा वरील कालवधीत कर्मचारी निंबलीत असल्यास व सदर कालावधी नियमित केला नसल्यास अशा कर्मचा-याना वरील लाभ अनुज्ञेय असणार नाही अशा कर्मचा-यांचे सुधारित प्रस्ताव पाठवून दयावे.

६. दिलेल्या नमुन्यातील बंधपत्र घेऊन ते सेवापुस्तकी जतन करावे.

९. सदर आदेशाची सेवापुस्तकात नोंद घ्यावी.

**१०. वरील कर्मचाऱ्यांनी खाली दिलेल्या नमुन्यात बंधपत्र हे संबंधित अधिकाऱ्यासमोर पूर्ण करुन देणेचे आहे.**

---

**बंधपत्र**

सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना लागू केलेनंतर सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनूसार मला प्रत्यक्ष पदोन्नती दिलेस व ती पदोन्नती मी नाकारली अगर पदोन्नतीस अपात्र ठरलो तर मला मंजूर करणेत आलेली पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना काढून घेण्यास व काढून घेतल्यानंतर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित योजनेनूसार जणूकांही या योजनेचे लाभ दिले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनूसार वेतन निश्चिती करण्यास व होणाऱ्या वसूलीस माझी संमत्ती आहे. सदरचे बंधपत्र मी स्वखुषीने लिहून दिले आहे. याबाबत माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही वा भविष्यात करणार नाही. म्हणून लिहून दिले असे.

(सही - अमन मित्तल)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर.**

प्रति,
संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य त्या मागाने-

**प्रत माहितसाठी व कार्यवाहीसाठी-**

गट विकास अधिकारी पंचातय समिती आजरा / करवीर
वैद्यकिय अधिकार - प्राथमिक आरोग्य केंद्र / भादवण ता.आजरा / भुये ता.करवीर

२/- सोबतचे आदेशाची प्रत संबंधितांस लागू करुन पोहोच घ्यावी. तसेच वरील नमुन्यात बंधपत्र घेऊ-न ते दप्तरी ठेवावे. व विकल्प प्रपत्र हे मुळ सेवा पुस्तकात चिकटवणेत यावे.

**स्थळ प्रतीवर मा.मु.का.अ**
**यांची स्वाक्षरी असे ...**

(रविकांत आडसुळ)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**